**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

जा.क्र.अम / सका - ०५ / २०१९.
महानगरपालिका सचिव कार्यालय.
दिनांक : १७ / १० / २०१९.

**अहमदनगर महानगरपालिकेच्या विशेष सभेची सुचना**

( महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची ड चे प्रकरण - २ नियम क्र.१ (ड) अन्वये )

**सभा सुचना क्रमांक ०५, मंगळवार दिनांक २२ / १० /२०१९.**

प्रति,
मा.श्री. / श्रीमती............................................

सदस्य,
अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

महोदय,

यांस.-

याद्वारे कळविण्यांत येते की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची ड चे प्रकरण २ नियम क्र. १ ( ड ) अन्वये मा.महापौर यांनी अहमदनगर महानगरपालिकेची विशेष सभा **मंगळवार दिनांक २२/१०/२०१९ रोजी सकाळी १०.०० वाजता अहमदनगर महानगरपालिकेचे नविन प्रशासकीय इमारत (राजमाता जिजाऊ सभागृह) औरंगाबाद रोड, अहमदनगर** सोबतच्या विषय पत्रिकेतील कामकाज चालविण्यांसाठी आयोजित केली आहे.

आपणांस सभेस उपस्थित राहण्यांची विनंती करण्यांत येत आहे.

**सोबत :** १. विषय पत्रिका
२. प्रस्तावाची टिप्पणी

प्र.नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

सभा क्रमांक - ५ मंगळवार दिनांक २२ / १० / २०१९ रोजी सकाळी १०.०० वाजता **(राजमाता जिजाऊ सभागृह) औरंगाबाद रोड, अहमदनगर येथे** होणा-या विशेष सभेची विषय पत्रिका.

---*---

| विषय क्र. | विषय |
|---|---|
| २४ | मा.उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठ येथे याचिका क्रमांक ६४०६/२०१६ मध्ये दिनांक १६/१०/२०१९ रोजी दिलेल्या आदेशानुसार तात्काळ विशेष महासभा घेवून मौजे-बु-हाणनगर ता.नगर येथील सर्व्हे नं.४५/२ब मधील प्लॉट नंबर १ व २ चे ७१९.०० चौ.मी.तपोवन डि.पी.रस्त्याकरीता बाधित होणा-या जमिनीची मोबदला देणे संबंधित निर्णय घ्यावा किंवा जागेची आवश्यकता महानगरपालिकेला आहे अगर नाही याबाबत निर्णय घेणे बाबत... |
| २५ | मा.सदस्य यांचे रजेचे अर्ज |

मा.महापौर सो, यांचे मान्यतेने.
दिनांक : १७/१०/२०१९

प्र.नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**प्रस्ताव क्रमांक :- २४** **दिनांक : २२ /१० /२०१९.**

---

**प्रस्तावाचा विषय :-** मा.उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठ येथे याचिका क्रमांक ६४०६/२०१६ मध्ये दिनांक १६/१०/२०१९ रोजी दिलेल्या आदेशानुसार तात्काळ विशेष महासभा घेवून मौजे-बु-हाणनगर ता.नगर येथील सर्व्हे नं.४५/२ब मधील प्लॉट नंबर १ व २ चे ७१९.०० चौ.मी.तपोवन डि.पी.रस्त्याकरीता बाधित होणा-या जमिनीची मोबदला देणे संबंधित निर्णय घ्यावा किंवा जागेची आवश्यकता महानगरपालिकेला आहे अगर नाही याबाबत निर्णय घेणे बाबत...

---*---

**प्रस्तावाचा मजकुर :-**

महानगरपालिकेस मंजूर विकास योजनेतील नगर-औरंगाबाद मार्गालगत इंद्रायणी हॉटेल ते कॉटेज कॉर्नर मनमाड रोड पर्यंत २४.०० मीटर रुंदीचा तपोवन जोड रस्त्या करीता बु-हाणनगर येथील श्री.नंदलाल जोशी यांचे मालकीचे सर्व्हे नंबर ४५/२ब मधील प्लॉट नं.१ व २ चे ७१९.०० चौ.मी. बाधीत होणा-या क्षेत्राची मा.जिल्हाधिकारी, यांचे अध्यक्षतेखाली जिल्हा समितीने वाटाघाटीने थेट खरेदी पध्दतीने रक्कम रुपये १,०७,९६,२९४/- निश्चित केलेली आहे.

भूसंपादन व देय रक्कमेबाबत जमिन मालक श्री.नंदलाल जोशी यांनी मा.उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठ येथे याचिका क्रमांक ६४०६/२०१६ दाखल केलेली आहे. निश्चित केलेली देय रक्कम जमिन मालक यांना अदा करण्यासाठी येणा-या खर्चास महासभेची मंजूरी आवश्यक असल्याने तसा प्रस्ताव सादर करण्यात आलेला होता.

महासभेचे १४/०८/२०१९ रोजीचे बैठकीत प्रस्ताव क्रमांक १४ मध्ये नमूद विषयांकित भू-संपादन अनुषंगाने व समितीने निश्चित केलेली रक्कम जमिन मालकास अदा करावी अगर कसे ? याबाबत मा.नगरविकास विभाग मुंबई यांचेकडून मार्गदर्शन मागविणे कामी मनपाच्या विधी सल्लागार यांचे मत घेवून प्रस्ताव घेवून प्रस्ताव शासनाकडे सादर करणे व शासनाकडून मार्गदर्शन प्राप्त झाल्यास पुढील कार्यवाही करावी यांस सभा मान्यता देत आहे. असे नमूद केलेले आहे. तरी महासभेने ठरावात नमूद केले प्रमाणे या कार्यालयाने पत्र क्रमांक टी.पी.४२७८ दिनांक २७/०८/२०१९ ने ॲड.श्री.व्ही.एस.बेद्रे, उच्च न्यायालय, औरंगाबाद यांचेकडे अभिप्रायासाठी पाठविणेत आलेला आहे. अद्याप अभिप्राय प्राप्त झालेला नाही.

जमिन मालक श्री.नंदलाल जोशी यांनी मा.उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठ येथे याचिका क्रमांक ६४०६/२०१६ ची सुनावणी ना.हायकोर्ट खंडपीठ औरंगाबाद (मा.श्री.वराळे साहेब व मा.श्री.घारोटे साहेब) यांचे समोर दिनांक १६/१०/२०१९ रोजी झाली सदर सुनावणी दरम्यान मे.कोर्टाच्या हुकूमा प्रमाणे मा.महापौर व मा.उप आयुक्त (सामान्य) श्री.पठारे साहेब हे समक्ष न्यायालयात हजर होते.

सुनावणी पूर्ण झाल्यावर ना.कोर्टाने महानगरपालिकेस सदर अर्जदार श्री.नंदलाल जोशी यांची जागा संपादीत करणार आहे किंवा नाही याबाबत दिनांक २२/१०/२०१९ रोजी महानगरपालिकेची विशेष सभा बोलावुन सदर आदेशानुसार चर्चा करुन निर्णय घेणेचे व सदर निर्णय मे.कोर्टास दिनांक २२/१०/२०१९ रोजी १२.०० वाजेपर्यंत कळविण्याचे आदेश दिलेले आहेत.

त्यामुळे महानगरपालिकेस मंजूर विकास योजनेतील नगर-औरंगाबाद मार्गालगत इंद्रायणी हॉटेल ते कॉटेज कॉर्नर मनमाड रोड पर्यंत २४.०० मीटर रुंदीचा तपोवन जोड रस्त्याकरीता बु-हाणनगर येथील श्री.नंदलाल जोशी यांचे मालकीचे सर्व्हे नंबर४५/२ब मधील प्लॉट नं.१ व २ चे ७१९.०० चौ.मी.बाधीत होणा-या क्षेत्राची मा.जिल्हाधिकारी, यांचे अध्यक्षते खाली जिल्हा समितीने वाटाघाटीने थेट खरेदी पध्दतीने भू-संपादन करणे बाबतचा प्रस्ताव मा.उच्च न्यायालयाने दि.१६/१०/२०१९ रोजी दिलेल्या आदेशानुसार निर्णयार्थ महासभेपुढे सादर करणेस आदेशार्थ सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की, अ नुसार आदेशार्थ सादर.

**चर्चा -**

**मा.श्री.मनोज कोतकर :-** आजचा जो विषय पत्रिकेवरील विषय चर्चेत आला आहे तसाच आमच्या भागातील केडगांव देवी रोडचा विषय आहे. त्याठिकाणी जमीन मालकाने रस्त्यावरच पाच फुटाची भींत बांधली आहे. त्या ठिकाणी एखादे वाहन धडकुन चार-पाच जणांचा जीव जाईल तेंव्हा प्रशासन जागे होईल. तो रस्ता का राहीला याचा खुलासा करावा.

**मा.महापौर सो :-** अगोदर विषयपत्रिकेवरील विषय घेवू.

**मा.श्री.शेख मुदस्सर :-** कोर्टात आपण महानगरपालिकेची बाजू व्यवस्थीत मांडली का. कोर्ट विभागाचे कोणी असतील त्यांनी खुलासा करावा.

**मा.महापौर सो :-** मा.न्यायालयात आयुक्त यांचे वतीने उपायुक्त श्री.पठारे, नगररचना विभागाचे श्री.जोशी व मी स्वत: उपस्थित होतो.

**सहा.नगररचनाकार श्री.वैभव जोशी :-** अहमदनगर शहराच्या वाढीव हद्दीच्या मंजूर विकास योजनेत हा रस्ता महानगरपालिका हद्दीत आहे. २४ मीटर रस्त्याची अलाईनमेंट आपल्या डीपीत दर्शविली आहे. सन २०१० मध्ये महानगरपालिका महासभेत जमीन संपादीत करण्यास मंजूरी देण्यात आलेली आहे.

**मा.महापौर सो :-** आपण रस्त्यासाठी जमिनीची मागणी केली का. जमीन मालकाने मागणी केली.

**सहा.नगररचनाकार श्री.वैभव जोशी :-** जमीन मालकाने मागणी केली आहे.

**मा.महापौर सो :-** त्यावेळी जमीनीची किंमत ११ लाख होती. आज ती एक कोटी झाली आहे. मग त्यावेळेसच जमीन ताब्यात का घेतली नाही. नगररचना विभागामुळे ११ लाख रुपये देणे ऐवजी आज त्याच जागेची किंमत १ कोटी मोजण्याची वेळ महानगरपालिकेवर आली आहे.

**सहा.नगररचनाकार श्री.वैभव जोशी :-** जमीन संपादन करण्याची प्रोसेस करण्यात आली होती. मध्यंतरी भुसंपादन कायदा बदलला, भुसंपादन अधिकारी यांनी जागेची किंमत ठरविली आहे.

**मा.श्री.विनीत पाऊलबुधे :-** पुन्हा एकदा हा विषय महासभेसमोर चर्चेला आला आहे. याबाबत सखोल चर्चा व्हायला हवी. सुरुवातीला प्रस्ताव होता की ले-आऊट होता. प्रमुख ग्रामीण मार्ग म्हणुन कलेक्टरांनी हा रस्ता निर्देशीत केला होता. जमीन मालकाची खरेदी कधीची आहे. त्यांनी ती जागा खरेदी केली त्यावेळी तो रस्ता होता का. ज्यावेळेला ले-आउट पडत गेले तसा रस्ता खाली सरकत आला. हा जो प्रकार घडला त्यांना त्यांचा प्लॉट सापडला नाही म्हणुन त्यांनी शेजारी अतिक्रमण केले. शासनाने सदर जागेत रस्ता दाखविला आहे. कलेक्टर ऑफिस मधील झालेल्या चुकांची झळ आपल्याला बसत आहे. कलेक्टर साहेबांशी आपण चर्चा करावी. तेथून वरती जे ले-आउट आहेत त्या सगळया ले-आउटची तपासणी करावी. आमचा या विषयाला विरोध आहे. तो प्लॉट तेथे कसा आला हे आपण पहायला पाहीजे. वरच्या प्लॉटमध्ये ओढा आहे. त्यामुळे माझी विनंती आहे कलेक्टर साहेबांकडे आपण विचारणा करावी. स्पॉटच्या वरचे ले-आउट तीथपासुन मोजत आणावे त्यांनी दिलेल्या मंजू-या तपासाव्यात. हा रस्ता ग्रामीण जिल्हा मार्ग म्हणुन दर्शविलेला आहे.

**सहा.नगररचनाकार श्री.वैभव जोशी :-** त्या ले-आउट ला ८ जून १९८३ साली मंजूर मिळालेली आहे.

**मा.श्री.विनीत पाऊलबुधे :-** कोर्टाने उद्या आदेश दिला तर त्याला तुम्ही जबाबदार आहात. त्यावेळेस बु-हाणनगर हायवे आहे तो रस्ता कधी झाला याची माहिती घेतली का.

**मा.महापौर सो :-** हा रस्ता कधी मंजूर झाला.

**सहा.नगररचनाकार श्री.वैभव जोशी :-** १४ जुलै २००५ ला प्रादेशीक विकास योजना मंजूर झालेली आहे.

**मा.श्री.विनीत पाउुलबुधे :-** हा रस्ता ग्रामीण जिल्हा मार्ग आहे हे मान्य आहे का. प्रत्येक तालुक्याची जिल्ह्याची रस्त्याची सूची शासनाने मान्य केलेली आहे. या विषयाच्या इतिहासात आपण गेलो तर तेथे काय परिस्थिती होती हे लक्षात येईल. त्यावेळेस सात-बारा कोणाचा निघत होता. दुसुंगे मळयापासुन ले आउटची तपासणी केली तर सर्व बाबी समोर येतील. ही जागा आपल्या मालकीची नाही त्याचा मोबदला आपल्याला द्यायचा विषयच येत नाही.

**सहा.नगररचनाकार श्री.वैभव जोशी :-** मान्य आहे.

**मा.श्री.मनोज कोतकर :-** देवी रोड बाबत काय कारवाई केली.

**सहा.नगररचनाकार श्री.वैभव जोशी :-** जमीन मालकाने जिल्हा न्यायालयात दावा दाखल केला आहे.

**मा.श्री.मनोज कोतकर :-** त्या वेळेस त्या रस्त्याती जमिनीची किंमत किती होती व आज किती आहे. ते जर टीडीआर मागत असतील तर आपण काय कारवाई केली.

**सहा.नगररचनाकार श्री.वैभव जोशी :-** आपण त्यांना टीडीआर च्या माध्यमातुन मागणी करणेबाबत पत्र दिले आहे.

**मा.श्री.मनोज कोतकर :-** असे किती रस्ते आहेत. आज जेथे एक लाख किंमत आहे त्या जमिनीचे नंतर एक कोटी रुपये द्यावे लागतील.

**सहा.नगररचनाकार श्री.वैभव जोशी :-** टीडीआर च्या माध्यमातुन द्यायला हरकत नाही. नगररचना विभागाकडे अर्ज आले की आपण प्रोसेस करतो.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** आपले टीपी मध्ये जे काम आहे प्रोसेस म्हणजे काय करतात. या रस्त्याला खर्च करण्यापेक्षा नागरीकांच्या सुविधासाठी खर्च करावा.

**मा.श्री.मनोज कोतकर :-** केडगांव देवी रस्त्यावर जर एखादी दुर्घटना घडली तर आम्ही प्रशासनावर गुन्हा दाखल करु किती दिवसांत कार्यवाही करणार याचे आपण उत्तर द्या.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** तुम्ही पुर्ण माहिती का देत नाही. जमीन मालक जर महानगरपालिकेला ब्लॅकमेल करीत असेल तर पहा. जिथे कोर्टाने दिलेल्या निर्णयानुसार जर कर्मचारी घेण्याची वेळ आली तर घेत नाही. जोशी ब्लॅकमेल करीत असेल तर ती जागा आपण घेवू नका.

**मा.श्री.रविंद्र बारस्कर :-** आजचा जो विषय आहे टीडीआर मंजूरीसाठी नगररचनाकार विभागाकडे फाईल दाखल होतात त्यावर लवकर निर्णय घेतला जात नाही. त्यामुळे अशी वेळ येते. फाईलवर लवकर निर्णय घेतले तर नागरीक कोर्टात जाणार नाही.

**मा.श्री.विनीत पाउुलबुधे :-** त्या प्लॉटची हिस्ट्री काढा असे यापुर्वी मी सांगीतले आहे. नंदलाल जोशींनी ओढयात जागा घेतली आहे. यात झालेली चूक ते सुधारत आहेत. आपण जर निर्णय घेत असाल तर त्यास माझा विरोध आहे. मी कोर्टात जाईल.

**मा.श्री.संपत बारस्कर :-** मा.आमदार संग्रामभैय्या जगताप यांनी सदर रस्त्यासाठी ३ कोटी रुपयांचा निधी मंजूर करुन आणला आहे. नागरिकांच्या सुविधेसाठी हा रस्ता करता येत असेल तर सर्व बाबी तपासाव्यात व प्रशासनाने विचार करावा.

**मा.सौ.सुरेखा कदम :-** अजुनही असे विषय पेंडींग आहेत भुयारी गटार प्लॅन्ट साठी जागा भुसंपादनाचा विषय पेंडींग आहे. हरीत लवादाने महानगरपालिकेत दंड आकारणी होवू नये म्हणुन यावर कार्यवाही करावी.

**मा.सौ.बारस्कर दिपाली :-** तपोवन रोड तेथील नागरिकांच्या दृष्टीने महत्वाचा आहे. जागेची रक्कमही मोठी आहे. न्यायालयात व्यवस्थीत महानगरपालिकेची बाजू मांडली जात नाही. एक कोटी रक्कम मोठी आहे. नागरिकांना खुप समस्या आहेत या गोष्टींवर रक्कम खर्च करावी. मुख्यलेखापरिक्षक खरात साहेब यांनी मागील सभेत आपला रोल येत नाही. असे सांगीतले आहे.

**मा.सौ.कराळे आशाताई :-** जमीन मालकास जमीन देवून टाकावी. जमीन मालकाला डेव्हलपमेंट करण्यासाठी जागा त्यांना देण्यांत यावी.

**मा.श्री.सुनिल त्र्यंबके :-** जागा आपल्या हद्दीत येत नाही.

**मा.श्री.महेंद्र गंधे :-** नियमानुसार कार्यवाही करावी.

**मा.महापौर सो :-** आज महासभेत ब-याच सदस्यांनी या विषयावर आपले मत मांडले सभागृहाचा कल पाहता हा रस्ता आपल्या हद्दीत नसल्याने टीडीआर देता येत नसेल तर त्यांना रोख स्वरुपात रक्कम न देता जागा मालकाने केलेल्या मागणी नुसार त्यांना जागा विकसीत करण्यासाठी देण्यात यावी. तो रस्ता ग्रामीणमध्ये जात आहे. जमीन मालकाला जागा विकसीत करण्यासाठी जमीन ताब्यात देण्यात यावी. याबाबत मा.उच्च न्यायालयाने जागा ताब्यात घ्यायची किंवा नाही याबाबत निर्णय घेण्याबाबत स्पष्ट आदेश दिले आहेत. त्यामुळे जागा महानगरपालिकेच्या हद्दीत नसल्यामुळे जागा मालकाने डेव्हलमेंट करावी. आपण जागा घेत नाही. त्या मालकावर आपले कुठलेही बंधन नाही.

**---*---**

**ठराव :-**

ऑफिस रिपोर्ट बाबत मा.महासभेत झालेली चर्चेचा कल पाहता मौजे-बु-हाणनगर ता.नगर येथील सर्व्हे नं.४५/२ब मधील प्लॉट नंबर १ व २ चे ७१९.०० चौ.मी.तपोवन डि.पी.रस्त्याकरीता बाधित होणारी जमिन महानगरपालिकेच्या हद्दीत नसल्याने टीडीआर देता येत नसेल तर रोख रक्कम न देता जागा मालकाने मा.न्यायालयामध्ये केलेल्या मागणीनुसार त्यांना जागा विकसीत करण्यासाठी महानगरपालिकेची कोणतीही हरकत राहणार नाही. जागा मालकाने सदरची जागा कायद्यानुसार विकसीत करावी. यास ही सभा मान्यता देत आहे.

नियमानुसार पुढील योग्य ती कार्यवाही करावी.

**सूचक :-** मा.सौ.आशाताई शिवाजी कराळे,

**अनुमोदक :-** मा.श्री.रविंद्र रावसाहेब बारस्कर,

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका